20-21
conf.



# AKSHAR WANGMAY

**International Peer Reviewed Journal**

## UGC CARE LISTED JOURNAL

**October – 2020**

**Special Issue-I**

**On**

# *Recent Trends and Issues in Social Science & Science Towards Sustainable Development*

**Chief Editor**

**Dr. Nanasaheb Suryawanshi**

PRATIK PRAKASHAN, 'PRANAV, RUKMENAGAR, THODGA ROAD AHMEDPUR, DIST. LATUR, -433515, MAHARASHTRA

**Executive Editor**

**Prin. Dr. R. K. Pardeshi**

Principal

Sant Ramdas Arts, Commerce and Science College, Ghansawangi

Dist. Jalna

**Co-Editor**

Dr. S.V. Tathe

**Editorial Board**

Dr. R.S. Dhaye

Dr. R.K. Raut

Dr. G.R. Awachar

Prof. S.V. Samag

Published by- Prin. Dr. R K Pardeshi, Principal, Sant Ramdas Arts, Commerce and Science College, Ghansawangi Dist. Jalna

The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.

© All rights reserved with the Editors Price :Rs.1000

i

M.G. Art's, Science & late N.P. Commerce College, Armori

Principal
Mahatma Gandhi Arts, Science & Late N. P. Commerce College, Armori, Dist - Gadchiroli

| | | |
|---|---|---|
| 5 | भारतातील आर्थिक, सामाजिक, राजकिय व सांस्कृतिक विकासाची शाश्वत संकल्पना - एक सामाजिक भौगोलिक अभ्यास<br>**प्रा.सामग सुनिल व्यंकटेश & प्रा. डॉ. देवकर भाऊसाहेब सोनाजी** | 179-183 |
| 7 | भारतातील बालमजुरी समस्या एक सामाजिक दृष्टीकोण<br>**प्रा. डॉ. गजेंद्र एम. कढव** | 184-187 |
| 8 | आघाडीचे राजकारण : जागतिक परिदृश्य<br>**प्रा. शरद बाबुराव सोनवणे & प्रा. दिनकर लहू पाटील** | 188-189 |
| 9 | चंद्रपूर जिल्हयातील सिंचन अनुशेषामुळे कृषी उत्पादनावर व उद्योग व्यवसायातील रोजगार संधीवर झालेल्या परिणामाचे अध्ययन<br>डॉ. हरेश टि. गजभिये | 190-192 |
| 50 | मुस्लिम मराठी आत्मचरित्रांतील हिंदू--मुस्लिम सहजीवन<br>प्रा. वसंत गायकवाड | 193-196 |


M.G. Arts, Science & late N.P. Commerce College ★ Armori ★

Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli

# भारतातील बालमजुरी समस्या एक सामाजिक दृष्टीकोण

प्रा. डॉ. गजेंद्र एम. कढव
समाजशास्त्र विभाग प्रमुख
महात्मा गांधी महाविद्यालय, आरमोरी, जिल्हा- गडचिरोली

सारांश :

संत तुकाराम महाराज यांनी आपल्या अभंगातून ''लहानपण देगा देवा, मुंगी साखरेचा रवा'' असे बालपणाचे महात्म वर्णिले आहे. बालपण, लहानपण असे शब्द उच्चारताच आपल्याला खेळकर, खोडकर प्रवृत्ती, उत्लडपणा, आनंदीपणा इ. आचरण सहज नजरेसमोर येतात.परंतु असा आनंद काही मुलांचाच नशिबी असते. संपूर्ण जगातच असे कोट्यवधी मुले आहेत की त्यांना अश्या आनंदापासून मुकावे लागते ते मुले म्हणजे बालकामगार होय. बालपणातच त्यांच्या आयुष्यात कष्ट पिळवणूक, मलीन्छ परिसरात राहणे वाट्याला येत असते. खेळण्याच्या, शिकण्याच्या वयात हे चिमुकले हात राबणारे आणि कष्ट करणारे बनतात आणि त्यांचे गोंडस -- गोजिरवाणे बालपण गुलामगिरीच्या विळख्यात सापडते. तसेच या गुलामगिरीमुळे बालमजूर आपले सर्वस्व हरवून मालक वर्गाच्या अन्याय, अत्याचारास बळी पडते. ही बालमजुरी समस्या फक्त शहरी समाजापुरतीच मर्यादित नाही तर ग्रामीण समाजात सुद्धा ही खूप मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. प्रस्तुत संशोधन अध्ययनात भारतामध्ये बालमजुरीची सध्यस्थिती कश्या प्रकारे आहे, त्यांच्या समस्या कश्या प्रकारे आहे या विषयी अध्ययन करण्याच्या प्रयत्न केलेला आहे.

बिज शब्द :कुटुंबाचे विघटन, बालकामगार, निरक्षर, पोशिंदा, कर्तीपिढी, अन्याय, पिळवणूक, गोंडस- गोजिरवाणे, गुलामगिरी.

**प्रस्तावना :**

औद्योगीकरण, नागरीकरण, वाढती लोकसंख्या, नागरीकरण, गरिबी, कुटुंबाचे विघटन, अनाथपणा, शेती व्यवसाय इ. कारणांमुळे आज देशामध्ये मोठ्या प्रमाणात बालमजुरांची संख्या वाढत असल्याची दिसून येते जी एक कर्ती पिढीच गारद करीत आहे. कमी मजुरीत बालमजूर उपलब्ध होत असल्यामुळे मालक वर्गाला यांची खूप मागणी असते. जगातील प्रत्येकच देशामध्ये ही समस्या आपल्याला दिसून येत आहे. बालमजुरी समस्या ही शहरी समाजापुर्तीच मर्यादित नाही तर ग्रामीण समाजात सुद्धा ही खूप झपाट्याने वाढत आहे. भारत हा खेड्यांच्या देश आहे कारण भारतामध्ये जवळपास ७०% लोकसंख्या ही खेड्यात निवास करते. भारतीय ग्रामीण समाजात शेती हा प्रमुख व्यवसाय आहे आणि शेती करणारा शेतकरी हा संपूर्ण देशाच्या पोशिंदा किंवा अन्नदाता आहे. म्हणूनच भारतामध्ये शेतकरी सुखी तर देश सुखी असे म्हटल्या जाते महात्मा गांधी यांनी खेड्यांच्या विकास हाच देशाच्या विकास मानून खेड्यांकडे चला असा नारा दिला परंतु आज मात्र भारतीय ग्रामीण समाजात नवनवीन समस्यांनी जन्म घेतलेला आहे त्यातीलच एक महत्वाची आणि गंभीर समस्या म्हणजे ग्रामीण क्षेत्रातील बालमजुरीची समस्या होय. शहरी समाजात किंवा सभ्य समाजात बालमजुरांच्या प्रगतीसाठी अनेक शासकीय, अशासकीय संघटना अस्तित्वात असतात परंतु ग्रामीण समाजात मात्र अश्या कोणत्याही स्वरुपाची संघटना अस्तित्वात नसल्याने ग्रामीण भागात किती बालकामगार आहेत यांची नोंद सुद्धा होत नाही. भारतामध्ये ओरिसा, बिहार,उत्तरप्रदेश, झारखंड इ. राज्यांमध्ये बालकामगारांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात आहे. महाराष्ट्रात सुद्धा विदर्भ, मराठवाडा हा भाग कृषी आणि जलसिंचनाच्या बाबतीत मागासलेला असल्यामुळे येथे ग्रामीण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बालमजुरांची संख्या दिसून येत आहे. बालक हा राष्ट्राच्या कणा समजला जातो परंतु बालमजुरी समस्येमुळे हा कणाच मोडण्याची वेळ आली आहे. म्हणूनच बालमजुरी ही या एक गंभीर समस्या आहे जी येथील संपूर्ण कर्ती पिढीच गारद करीत आहे.

**बालमजूर म्हणजे काय ?:** बालमजूर म्हणजे अज्ञानी मजूर की जाचे वय १४ वर्षापेक्षा कमी आहे. बालमजुरांच्या कक्षेत वयाला खूप महत्व आहे. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने १४ - १६ हा वयोगट बालमजुरांसाठी निश्चितकेला आहे. भारतीय राज्यघटनेतील कलम २४ अनन्वे १४ वर्षाखालील मजुराला बालमजूर म्हणून समजले आहे

**भारतातील २०११ च्या जनगणना अहवालानुसार बालमजुरांची संख्या**

२०११ च्या भारतीय जणगणनेमध्ये ५ ते ९, 10 ते १४ आणि 15 ते १९ या वयोगटातील बालमजुरांची आकडेवारी घोषित करण्यात आली ती खालील सारणीतून दिसून येते.

| भारतातील २०११ च्या जनगणना अहवालानुसार बालमजुरांची संख्या | | | | |
|---|---|---|---|---|
| अनु.क्र. | वयोगट | मुले | मुली | एकूण |
| १ | ५ ते ९ | ६३०८७५ | ४७७९३३ | ११०८८०८ |



M.G. Arts, Science & late N.P. Commerce College ★ Armori ★
Principal
Mahatma Gandhi Arts,
Science & Late
N. P. Commerce College,
Armori, Dist - Gadchiroli